३५४

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.

विषय ... इ.स. ...

दा. क्र. ३५४

ऐतिहासिक लेख

BVBK-0400354

इतिहासातील गोष्टी

मधुकर इंगळे

म. प्रं. ग्रं. कॉ., ग्रंथालय शाखा.
वर्ग क्रमांक वाचन
वा, क्र. 354... दिनांक .....
विषय ललित..... क्र.....

BVBK-0400354

नागपूर प्रकाशन

नागपूर प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर-१२

अनुक्रम

१ बदला
२ पृथ्वीराज
३ असा होता अल्लाउद्दीन
४ वेडा सुलतान
५ शूर दुर्गावती
६ केवढे हे स्वातंत्र्य प्रेम
७ बालपणाचे बोल
८ न्यायी जहांगीर

किंमत १.७५ पैसे

सर्व हक्क प्रकाशकाधीन

नागपूर प्रकाशन

प्रथमावृत्ती
७ जानेवारी : १९७८

बाल साहित्य क्रमांक : ५५

मुद्रक :
म. पां. बनहट्टी
नारायण मुद्रणालय
धंतोली, नागपूर-१२

प्रकाशक :
दि. मा. घुमाळ
नागपूर प्रकाशन,
सीताबर्डी, नागपूर-१२

१ : बदला

नजराण्याने भरलेली आठ जहाजे सिलोनहून निघाली. त्यात अमौलिक भेटी होत्या. तो नजराणा सिलोनच्या राजाने खलिफा वालिदला पाठविला होता. जहाजात मुसलमान यात्रेकरू होते. यात्रेकरू मक्केला जाणार होते.

जहाजे देवल बंदरात येऊन थडकली. आणि काय... चाच्यांची धाड जहाजांवर येऊन पडली. त्यांनी हल्ला केला. जहाजे लुटली, मुसलमान यात्रेकरूंना कैद केलें. चाचे म्हणजे लुटारू.

खलिफा वालिदला ही वार्ता समजली. तो क्रोधायमान झाला. त्याने सिंधच्या दाहीर राजाला कडक लिहिलें, "मुसलमान यात्रेकरूंची ताबडतोब सुटका करावी. लुटलेल्या नजराण्याची नुकसान भरपाई व्हावी. अन्यथा सैन्य पाठवून वाटेल तशी भरपाई करण्यात येईल."

खलिता निघाला. दाहीरच्या हाती आला. राजानं उत्तर पाठविले, "देवल बंदर आमच्या ताब्यात नाही. सबब आपल्या जहाजांची जुम्मेदारी आमच्यावर नाही. नुकसान भरपाई आम्ही देऊ शकत नाही. त्याबाबत चाच्यांशी झगडा."

खलिफाच्या हुकूमानुसार हजाजने सैन्य सज्ज केले. अब-दुल्ला नावाच्या अरब सेनापतीच्या आधिपत्याखाली सैन्य रवाना केलें. चाच्यांची आणि अरब सैनिकांची लढाई जुंपली. चाच्यांनी जोरदार मारा केला. या माऱ्यापुढे अरबी सैन्याचा टिकाव

लागला नाही. त्यांना हार खावी लागली. चाचे विजयी झाले. अरब सैनिक पळत सुटले.

पराभवाचे शल्य हजाजला टोचू लागले. पुढल्या वर्षी म्हणजे इ. स. ७११ मध्ये सिंध प्रांतावर स्वारी करण्याची परवानगी त्याने खलिफापाशी मागितली. खलिफानें दिली.

यावेळी महंमद बीन कासीम या शूर वीराची सेनापती म्हणून निवड केली. कासीम सिंधकडे अफाट फौजेनिशी दौडू लागला. तो माकरान मधून देवल बंदरात उतरला. तेथे जाट लोक त्याला येऊन मिळालें. जोरदार मारा करून त्याने देवल बंदर हस्तगत केलें. तेथील लोकांची कत्तल केली.

नंतर तो दाहीर राजाकडे वळला. कासीमला तोंड देण्या-साठी राजा ससैन्य निघाला. दोन्ही पक्षाची गाठ रावेर येथे पडली. युद्धाला सुरवात झाली. दोन्ही पक्षाकडील वीर कोसळू लागले. यशाचा काटा दाहीरकडे झुकत होता. कासीम आपलें युद्ध कौशल्य पणाला लावीत होता. राजा हत्तीवर असलेल्या अंबारीत बसून शत्रूवर भराभर बाण सोंडत होता. शत्रूची मुंडकी अंतराळात उडवीत होता. इतक्यात—

शत्रू पक्षाकडून एक जळता बाण निघाला. सूं सूं करीत निघाला आणि नेमकाच अंबारीला शेंदला. अंबारीने पेट धेतला. हत्तीला चटके बसू लागले. तो घाबरला. भिथरला. चित्कार करीत समरभूमीवरून वाट फुटेल तिकडे पळू लागला, माहुताने हत्तीला आवरण्याचा प्रयत्न केला. पण छे ! हत्ती आवरेना. थांबेना. तो पळतच राहिला. नदी आडवी आली. हत्ती पाण्यात शिरला. दाहीरच्या मागे शत्रूचा लोंढा लागला. राजाने अंबारीतून पाण्यात

उडीं टाकली. पोहत निघाला. पलिकडच्या काठावर पोहचणार तोच खाडकन वार बसला. दाहीरचे मुंडके धडावेगळे झाले.

राजा ठार झाला ही वार्ता पसरली. त्याच्या सैन्याचा धीर खचला. ते रणातून पळू लागले. इथेही विजयश्रीने कासीमच्या गळ्यात माळ टाकली.

नंतर कासीम राऊर किल्ल्याकडे निघाला. त्या किल्ल्यात दाहीरची राणी होती. कासीमच्या सैन्याचे कडे किल्ल्याभोवती पडले. राणी शूर होती. किल्ला शत्रूच्या हाती पडू नये म्हणून तिने शिकस्त केली. पण फितुरीमुळे ती पराभूत झाली. राऊरचा किल्ला कासीमचा झाला. तो एकसारखा विजयीच होत गेला. कासीमचे निशाण किल्ल्यावर मोठ्या डौलानें फडक् लागले.

किल्ल्यात स्त्रिया होत्या. अप्रतिष्ठा होण्यापेक्षा मरण बरे म्हणून त्यांनी जोहार केला. कासीम किल्ल्यात प्रवेशला. दाहीरच्या दोन कन्या त्याच्या हाती सापडल्या. त्या अत्यंत सुंदर होत्या. दोन्ही राजकन्या खलिफाला नजर करण्याचे त्याने ठरविले.

हाती आलेल्या सिंध प्रांताचा बंदोबस्त करून तो ससैन्य मायदेशी परतला. सोबत दाहीरच्या मुली होत्या. त्याने खलिफाला दोन्ही राजकन्या नजर केल्या. खलिफा वालिद त्यांचे सौंदर्य पाहून बेहद्द खूष झाला.

त्या मुली म्हणाल्या, "आपल्या सेनापतीने–कासीमने आम्हाला आधीच भ्रष्ट केले."

झाले ! खलिफाचा कासीमविषयी क्रोधाग्नी भडकला. त्याने हुकूम सोडला, "आताच्या आता कासीमला ठार मारून त्याचे प्रेत माझ्यापुढे पेश करा."

मारेकरी निघाले. त्यांनी कासीमला ठार केले. तुकडे तुकडे केले त्याचे. त्याचा छिन्नविछिन्न देह खलिफापुढे दाखल केला. कासीमचा मृत देह पाहून खलिफाचा क्रोधाग्नी विझला.

राजकन्या आनंदातिशयाने खदखद हसल्या. त्या म्हणाल्या, "खलिफा ! कासीमने आम्हाला भ्रष्ट केले नाही. आम्ही खोटेंच सांगितले. आम्ही वडिलांच्या खूनाचा बदला घेतला. कासीमवर आम्ही भयंकर सूड उगविला. त्यामुळे आम्हाला अत्यंत आनंद वाटत आहे."

खलिफाकडून आपला छळ आणि विटंबना होऊ नये म्हणून लपवून आणलेल्या कट्यारींनी त्या मुलींनी आत्महत्या केली. आपल्या पावित्र्याचा डंका वाजवीत त्या स्वर्गात गेल्या.

* *

२ : पृथ्वीराज

कनोजच्या सिंहासनावर जयचंद राठोड हा राजपूत राजा राज्य करीत होता. त्याला एक कन्या होती. तिचे नाव संयोगिता. अप्सरेच्या सौंदर्याला लाजवील इतकी ती लावण्यसंपन्न होती.

राजकन्या मोठी होत होती. वाढत्या वयाबरोबर तिच्या सौंदर्याची कळी खुलत होती. ती उपवर झाली. लग्नाला आली. राजाने तिचे लग्न करण्याचे ठरविलें. राजकन्येच्या सौंदर्याची कीर्ती पृथ्वीराज चव्हाणच्या कानावर गेली. तिच्याशी आपले लग्न व्हावे अशी त्याच्या मनात इच्छा निर्माण झाली. पृथ्वीराज शूर आहे. सुंदर आहे, याबाबत संयोगितेला कळले. ती मनातून त्याच्यावर प्रेम करू लागली.

जयचंद राठोड व पृथ्वीराज चव्हाण यांच्यात वैर होते. शत्रुत्व होते. वास्तविक हे दोघे मावसभाऊ. सख्या दोन बहिणींचे मुले. राजा अनंगपाळाचे नातू. अनंगपाळाचे पृथ्वीराजावर अधिक प्रेम होते. मरतेसमयी त्यानें आपले दिल्लीचे राज्य दोन्ही नातवांना विभागून न देता एकट्या पृथ्वीराजाला दिले. स्थानेश्वर व दिल्ली ही दोन्ही राज्ये पृथ्वीराज सांभाळू लागला. दिल्लीचे राज्य एकट्या पृथ्वीराजाला मिळाले म्हणून जयचंदाला राग आला. त्याच्या हृदयोधानात पृथ्वीराजाविषयी द्वेषाचे तृण वाढू लागलें.

राजकन्येचे स्वयंवर ठरले. देशोदेशीच्या राजांना स्वयंवर पत्रिका गेल्या. एकदाचा तो दिवस उजाडला. मंगल वाद्ये वाजत

होती. मंडपात अनेक ठिकाणचे राजे आपापल्या स्थानी बसले होते. एका उंच आसनावर राजा जयचंद बसला होता. संयोगिता स्वयंवर मंडपात शिरली. तिच्या हातात वरमाला होती. पृथ्वी-राज मंडपात दिसतो का म्हणून तिचे डोळे त्याला शोधीत होते. पण स्वयंवर मंडपात पृथ्वीराज नव्हता. पृथ्वीराजाचा अपमान करावा या हेतूने स्वयंवराच्या द्वारापाशी त्याचा पुतळा जयचंदाने उभा केला होता. स्वयंवराला सुरवात झाली. राजकन्या एका एका राजा समोरून पुढे सरकत होती. ती थेट द्वारापाशी गेली आणि तिने पृथ्वीराजाच्या पुतळ्याच्या गळ्यात वरमाला टाकली. पुतळ्याच्या मागे लपलेला वेषधारी पृथ्वीराज पुढे झाला. त्याने संयोगितेला उचलले. घोड्यावर घातले आणि त्याच घोड्यावर स्वार होऊन त्याला पिटाळीत स्थानेश्वराकडे निघाला. त्याच्या मागे त्याचे शूर सैनिक दौडत होते. मंडपात एकच आवाज उठला. पृथ्वीराजाने संयोगितेला पळविले. . .संयोगितेला पळविले.

पृथ्वीराजाला पकडण्यासाठी व संयोगितेची त्याच्या ताव-डीतून सुटका करण्यासाठी जयचंदाने शूर सैनिक पिटाळले. पृथ्वीराजाचा घोडा विजेच्या वेगाने पळत होता. गेला. पृथ्वीराज दूर गेला. सैनिकाच्या हाती तो सापडला नाही. संयोगितेच्या संगतीत पृथ्वीराजाचे दिवस मोठ्या आनंदात चालले होते.

आणि एक दिवस गझनीचा सुलतान महंमद घोरी राज्य वाढविण्याच्या हेतूने हिंदुस्थानकडे वळला. त्याला प्रतिकार करण्यासाठी पृथ्वीराज निघाला. दोन्ही पक्षाची गाठ तराईच्या रणमैदानावर पडली. पृथ्वीराजाच्या जोरदार हल्ल्यापुढे घोरीचा टिकाव लागला नाही. तो पकडल्या गेला. घोरी शरण गेला. पृथ्वीराजाने दया दाखवून त्याला सोडून दिलें. घोरी निघून गेला.

युद्धात मिळालेल्या अपयशाने तो खचला नाही. उलट पृथ्वीराजाचा पराभव करण्यासाठी त्याने सैन्य वाढविले. दारूगोळा जमविला.

घोरी पुन्हा निघाला. तराईच्या रणमैदानावर येऊन उभा राहिला. पृथ्वीराज सुद्धा ससैन्य रणमैदानावर येऊन ठेपला. यावेळी पृथ्वीराजाची फारशी तयारी नव्हती. मागील जयामुळे त्याचे सैन्य गर्वाने फुगले होते. घोरीचे सैन्य मोठ्या आवेशाने तुटून पडले होतें. निकराने लढत होते. आपल्याला जय मिळाला पाहिजे म्हणून जोरदार मारा करीत होते. पृथ्वीराजाची शक्ती महंमद घोरीपुढे दुबळी ठरली. घोरीला जय प्राप्त झाला. पृथ्वीराज गिरफदार झाला. घोरीने त्याचा निकाल लावला. त्याला ठार केले.

* *

३ : असा होता अल्लाउद्दीन

अल्लाउद्दीन खिलजी ! दिल्लीच्या सुलतान जलालुद्दीनाचा हा फारच जवळच्या नात्यातला. प्रत्यक्ष पुतण्या. लहानपणापासून सुलतानाने त्याचे संगोपन केले. वाढविले. आपल्या पुतण्यावर त्याचा भारीं जीव होता. सुलतानाने आपली मुलगी देऊन त्याला जावई करून घेतले.

अल्लाउद्दीन शूर होता. महत्त्वाकांक्षी होता. तितकाच क्रूर होता. कुन्हा माणिकपूराच्या सुभ्यावर सुलतानाने त्याची नेमणूक केली होती.

वैभवशाली साम्राज्य म्हणून देवगिरीची किर्ती दुमदुमत होती. येथे अगणित संपत्ती होती. राजा रामदेवरायाच्या पदरी शूर शिपायी होते, महापंडित, महाकवी दरबारात बावरत होते. कलावान लोकांची येथे वाण नव्हती. सारेजण गुण्यागोविंदाने राहत होते. अल्लाउद्दीनाची वक्र नजर या साम्राज्याकडे गेली. त्याने ठरविले, देवगिरीवर स्वारी करायची. ती जिंकायची. पार साफ धुवून काढायची.

या स्वारीला काकाची म्हणजे सासऱ्याची परवानगी हवी होती. आपल्या मनातील इच्छा अल्लाउद्दीनाने सुलतानापुढे मांडली. सुलतानाने त्याच्या इच्छेला संमती दिली. आठ हजार घोडेस्वार घेऊन तो कुऱ्हा माणिकपुराहून दौडत निघाला. आडवा आला विंध्यपर्वत. विंध्यपर्वताला पार करून तो एलिचपुराकडे धावू लागला. एलिचपुराहून देवगिरी.

कुऱ्हा माणिकपुराचा सुभेदार अल्लाउद्दीन आपल्यावर चालून येत असल्याची वार्ता राजा रामदेवरायाला लागली. तो घाबरला. काय करावे हे त्याला सुचेना. किल्ल्यात फारसे सैनिक नव्हते. फक्त चार हजार. बाकीची सेना राजपुत्र शंकरदेवाच्या आधिपत्याखाली दुसऱ्याच लढाईत गुंतली होती. अल्लाउद्दीनाला तोंड देण्यासाठी तेवढ्याच लोकानिशी राजा किल्ल्यातून बाहेर पडला. किल्ल्यापासून चार मैलावर दोन्ही पक्षाची गाठ पडली. लढाईला प्रारंभ झाला. अल्लाउद्दीनाच्या लोकांनी असा काही जोरदार मारा केला की त्या मारामुळे राजा रामदेवरायाचे लोक पळत सुटले. किल्ल्यात येऊन दडले. किल्ल्याखाली देवगिरी आहे. देवगिरीतील लोकांवर अल्लाउद्दीनाने अत्याचार केला.

नंतर तो किल्ल्याकडे वळला. किल्ल्याभोंवती गराडा घातला. रामदेवरायाला कुणीतरी सांगितले, किल्ल्यातील धान्य संपले. किल्ल्यात धान्याच्या पोत्याऐवजी मिठाचीच पोती भरली गेली. झाले ! रामदेवराय जास्तच घाबरला. त्याचा धीर सुटला. आता ? शरण ! अल्लाउद्दीनाला शरण !

राजाने शरणागती कळविली. अल्लाउद्दीनाने निरोप पाठविला, "पन्नास मण सोने आमच्या पदरात टाका. शिवाय देवगिरीची आम्ही पोटभरेपर्यंत लूट करू. हे जर कबूल नसेल तर वेढा चालूच राहील."

उत्तर आलें, "कबूल ! आपल्या एकूण एक अटी आम्हाला मंजूर आहेत."

लढाई आटपून राजपुत्र शंकरदेव देवगिरीकडे येत होता. त्याला कळले, अल्लाउद्दीन किल्ल्याला वेढा देऊन बसला आहे. शंकरदेव संतापला. तो सपाटून निघाला. किल्ल्याची मान आवळून धरलेंल्या अल्लाउद्दीनावर घसरला. दोन्ही पक्षाकडील वीर कोसळू लागले. अखेर शंकरदेवाची सेना पराभूत झाली.

अल्लाउद्दीनाने परत किल्ल्याचा गळा आवळला. आणि रामदेवरायाचा जीव गुदमरला. तो पुरता शरण गेला. त्याने अल्लाउद्दीनाला हवी तेवढी संपत्ती दिली. दरवर्षी खंडणी द्यायचे कबूल केले. शिवाय आपली कन्या देऊन अल्लाउद्दीनाशी जवळचे नाते जोडलें. रामदेवरायाने आपली जेठाई नावाची कन्या अल्लाउद्दीनाला दिली. आपल्या पुतण्याचा पराक्रम पाहून जलालुद्दीन फारच खूष झाला.

आपल्या काकाचा काटा कसा काढावा याचा विचार अल्लाउद्दीन करू लागला. दिल्लीचे तख्त मिळविण्यासाठी तो धडपडू

लागला. एकदिवस म्हाताऱ्या जलालुद्दीनाच्या अंगावर तंबू कोसळला आणि त्याला मृत्यू आला. तंबू कोसळून जलालुद्दीनाचा अंत व्हावा याची व्यवस्था अल्लाउद्दीनाने केली होती. अशा रीतीने दिल्लीचे सिंहासन अल्लाउद्दीनाने बळकावले.

चितोडची राणी पद्मिनी अत्यंत सुंदर होती. तिच्या सौंदर्याची कीर्ती अल्लाउद्दीनाच्या कानावर गेली. तिला मिळविण्यासाठी तो चितोडवर चालून आला. चितोडला वेढा दिला. पण तो चितोड जिंकू शकला नाही. त्याने राणा भीमसिंहाला निरोप पाठविला, "मला फक्त राणी पद्मिनी दाखवा. नंतर मी वेढा उठवून दिल्लीला निघून जाईल."

"राणी पद्मिनीचे फक्त प्रतिबिंब दाखवू." राणाजीने कळविले.

अल्लाउद्दीन भीमसिंहाच्या म्हणण्याला राजी झाला.



अल्लाउद्दीनाला घेऊन भीमसिंह महालात आला, दाराआड उभी अललेल्या राणी पद्मिनीचे प्रतिबिंब आरशात उमटले. आरशातले प्रतिबिंब पाहून सुलतान खूष झाला. आनंदित झाला. त्याने मनाशी ठरविले, "बस ! राणी पद्मिनी मिळवायचीच. तिला आपली राणी करायची."

सुलतानाला पोहोचविण्यासाठी राणाजी किल्ल्यापासून बराच दूर गेला. आणि सुलतानाने त्याला अटक केली. आपल्या छावणीत नेले. सांगितले, "राणी पद्मिनीला माझ्या ताब्यात दिल्याशिवाय तुमची सुटका होणार नाही !"

राणीं पद्मिनी चतुर होती. तिने सुलतानाला कळविले, "मी आपल्या भेटीस येत आहे. माझ्याबरोबर दासी येतील." तिने सातशे पालख्या सजविल्या. प्रत्येक पालखीत हत्यारबंद शिपाई बसविला. पुढे शृंगारलेली पालखी व तिच्या पाठीमागून सातशे पालख्या छावणीकडे निघाल्या. शृंगारलेल्या पालखीत देखील हत्यारबंद राजपूत शिपाई होता.

इकडे अल्लाउद्दीन आनंदाने हूरळून गेला होता. तो राणीची प्रतिक्षा करीत होता. इतक्यात पालख्या आल्या. अल्लाउद्दीन त्या शृंगारलेल्या पालखीजवळ गेला. पडदा बाजूला सारला आणि काय ! हत्यारबंद शिपाई पालखीतून बाहेर पडला. तलवार उपसून तो सुलतानावर धावून गेला. सर्वच पालख्यातून आपापल्या तलवारी उपसून राजपूत शिपायी बाहेर पडले. सुलतानी सैनिकांची व राजपूत सैनिकांची लढाई जुंपली. भीमसिंहावरचा पहारा ढिला पडला. तो निसटला. घोड्यावर बसून किल्ल्याकडे पळाला. अल्लाउद्दीनाने दिल्लीकडे प्रयाण केले.

पुढील वर्षी अल्लाउद्दीन अफाट सैन्य घेऊन चितोडकडे निघाला. राजपुत भिडले. त्यांनी पराक्रमाची शिकस्त केली. पण त्याच्या पदरात पराभव पडला. चितोड अल्लाउद्दीनाचे झाले.

अल्लाउद्दीनाच्या हाती पडण्यापेक्षा मृत्यू बरा म्हणून किल्ल्यातील असंख्य राजपूत स्त्रियांनी जोहार केला. अग्निकुंडात उड्या घेतल्या. स्वत:ला जाळून घेतले. त्या अग्निकुंडात राणी पद्मिनीने देखील उडी घेतली. राणी पद्मिनीसाठी सुलतानाने दोन वेळा चितोडवर हल्ला केला. पण त्याला रिकाम्या हाताने दिल्लीला परतावे लागले.

देवगिरीवरून येणाऱ्या खंडणीचा ओघ एका वर्षी बंद झाला. अल्लाउद्दीनाने युद्धाची तयारी केली. मलिक काफूर याच्या हाताखाली तीस हजार सैनिक देऊन त्याला देवगिरीवर धाडले. मालिक देवगिरीवर कोसळला. राजपुत्र शंकरदेव आपल्या लोकानिशी मलिकला जोरदार प्रतिकार करू लागला. अखेर त्याला पराभवाचे बोट धरावे लागले. देवगिरीची वाटेल तशी लूट करून मलिकने दिल्लीकडे कूच केले.

राजा रामदेवरायाच्या मृत्यूनंतर शंकरदेव देवगिरीचा राजा बनला. आणि दिल्लीकडे जाणाऱ्या खंडणीचा ओघ खंडला. शंकरदेवाने एक पैसाही पाठविला नाही.

सुलतानाच्या हुकूमानुसार मलिक काफूर खंडणी वसूल करण्यासाठी देवगिरीकडे दौडू लागला. मलिकचा वेढा देवगिरी भोवती पडला. राजा शंकरदेव शत्रूवर चालून गेला. जोरदार लढाई झाली. शंकरदेवाने असंख्य शत्रू लोळविले. इतक्यात मलिकने घाव घातला आणि शंकरदेव उडाला. ठार झाला.

मलिकने लूट केली. लोकांची कत्तल केली. मंदिरे पाडली. स्त्रियांची विटंबना केली. देवगिरी येथे सुभेदार नेमून त्याने राजधानीची वाट धरली.

मलिकच्या शौर्यावर कर्तृत्वावर सुलतान खूष झाला. त्याने मलिकची पाठ थोपटली.

अल्लाउद्दीन म्हातारा झाला. तो १३१६ साली. मृत्यू पावला. पाहिलेत असा होता अल्लाउद्दीन !

* *

४ : वेडा सुलतान

त्या सुलतानाचे नाव. महंमद. तघ्लक घराण्यातील हा. ग्यासुद्दीन तघ्लकानंतर सुलताम पदाची माळ याच्या गळ्यात पडली. इ. स. १३२६ ते १३४७ या कालावधीत त्याने दिल्ली येथे राज्य केले. तो वेडा होता. वेडा होता याचा अर्थ असा की त्याची सगळी कारकीर्द वेडेंपणाची कृत्ये करण्यात गेली. म्हणून लोक त्याला वेडा सुलतान म्हणून संबोधीत.

त्याच्या मनात विचार आला, हिमालयातून चीनवर स्वारी करावी. तो देश जिंकावा. मग काय ! हुकूम सुटला. सैन्य निघाले. हिमालय केवढा उंच ! चढण्यास अवघड! बर्फाने आच्छादिलेला! बर्फाळ हिमालयातून जाता जाता सुलतानाचे सैन्य गारद झाले. चीनवर स्वारी करण्याची इच्छा मनातल्या मनात राहिली.

याच सुलतानाने नाणी पाडली. कशाची ? कातड्याची ! लोकांनी देखील कातड्याची वनावट नाणी केली. हळूहळू सुल-

तानी सोन्याचा खजिना रिता झाला. आणि त्या ठिकाणी कातडयाच्या नाण्यांचा ढीग जमला. कातडयाच्या नाण्याला किंमत राहिली नाही. प्रयत्न फसला. कल्पना अयशस्वी ठरली.

महमद तघ्लक शूर होता. पण क्रूर होता. जुलमी होता. स्वभावाने लहरी होता. विक्षिप्त होता.

त्याच्या वेडेपणाचा आणखी एक मासला.

एकदिवस महंमद आपल्या महालातील सुवर्ण मंचकावर पहुडला होता. मनात कल्पनांचे तुषार उडत होते. त्याला एक कल्पना सुचली. सुलतानाच्या दृष्टीने ती कल्पना सुंदरच म्हटली पाहिजे. तो मनाशी पुटपुटला, "बस्स ठरले ! त्याप्रमाणे झालेच पाहिजे !"

तो उठला. दरबाराकडे वळला. त्याच्या खास हुकूमानुसार दरबार भरविण्यात आला. प्रेक्षक आले. बडे बडे सरदार आपापल्या स्थानी बसले. सिंहासनावर सुलतान बसला होता.

सुलतान बोलला, "दिल्लीवासियांनो ! माझ्या मनात एक सुंदरशी कल्पना आली आहे. दिल्लीपेक्षा सुंदर राजधानी मला करावयाची आहे. माझ्या डोळ्यासमोर ते स्थळ सारखे दिसतेय."

"सरकार ! कोणते ते स्थळ ?" वजिराने विचारले.

"देवगिरी ! हिंदुस्थानच्या मध्यभागी असलेले ठिकाण. तिथे परकीय आक्रमण येणार नाही. सुरक्षितेच्या दृष्टीने फारच छान आहे ते ठिकाण. बस् ! ठरले ! दिल्ली राजधानी बदलून देवगिरी करायची."

सुलतानाचे बोलणे ऐकून दरबारातील लोक फारच घाबरले. त्यांची छाती धडधडायला लागली. भीतीने कंप सुटला. दिल्ली

ते देवगिरी कितीतरी मैलांचे अंतर ! इतक्या दूर जायचे ! सामानासुमानासहित ! बायकामुलांना घेऊन ! शेतीवाडी सोडून! घरे टाकून ! अरे बापरे ! अगदीच कठीण ! सुलतानाच्या मनातील ही वेडी कल्पना निघून जावी म्हणून त्यांनी बार बार अल्लाची प्रार्थना केली.

"सरकार ! एक विचारू." एक बडा सरदार म्हणाला.

"विचारा–विचारा. विचारायला मोकळीक आहे. तुमच्या मनातील विचार कळू द्या आम्हाला."

"आपली कल्पना छान आहे. पण––"

"पण काय ?"

"दिल्ली म्हणजे आपल्या प्रजाजनाचे राहते ठिकाण. हे ठिकाण सोडण्यास तयार होतील का लोक ? देवगिरी लांब आहे. इतक्या दूर जाणे अशक्य वाटते मला. जाताना लोकांचे फार हाल होतील . . ."

"बस्–बस्–बस्. पुरे करा आपले बोलणे. म्हणे लोकांचे फार हाल होतील. हाल झाले तरी चालतील. पण सर्वांनी दिल्ली सोडली पाहिजे. आणि देवगिरीच्या वाटेला लागले पाहिजे. आले ना सर्वांच्या ध्यानात ? चला, लागा आपापल्या तयारीला."

दरबार संपला. सुलतान आपल्या महालाकडें निघाला.

आणि एक दिवस मुंग्यांची रांग निघावी तशी दिल्लीतील प्रजाजनांची रांग देवगिरीकडे निघाली. दिल्लीत कुणीच राहिले नाही. पुढे प्रजा, मागे प्रजा, मध्यभागी हत्तीवर असलेल्या अंबारीत बसून सुलतान निघाला. मेण्यातून जनानखाना धावत होता.

वाटेत लोकांचे हाल होऊ लागले. त्यांना हा देवगिरीचा प्रवास सोसवत नव्हता. बरेच लोक मृत्यूमुखी पडले. एकदाचा हा कष्टप्रद प्रवास संपला. देवगिरी आली. सुलतानाने देवगिरी येथे आपली राजधानी थाटली. नव्या राजधानीला नाव दिलें दौलताबाद. देवगिरीचे दौलताबाद झाले.

तिथे लोकांच्या सोयी लागेनात. अनेक अडचणी उभ्या राहिल्या. प्रजा हवालदिल झाली. त्रासाला पारावार राहिला नाही. खाण्यापिण्याची पंचायत पडू लागली. दुष्काळाने वर डोके काढले. लोक पटापट मरू लागलें. सुलतानाचे डोके चिंतेने ग्रासले. त्याला प्रश्न पडला, आता काय करावे ?

परत हुकूम सुटला, "चलो दिल्ली !"

मेंढरावाणी प्रजा निघाली. अत्यंत हाल हाल सोसून दिल्लीला आली. यावरून सुलतान महंमद तघ्लकाला वेडा सुलतान कोण म्हणणार नाही ?

५ : शूर दुर्गावती

गढामंडळाचे राज्य अगदी छोटेसे. या राज्याचा कारभार पाहात होता दलपतशाहा. त्याचवेळी महोबा येथे किरानसिंह नावाचा राजपूत राजा राज्य करीत होता. त्याला एक कन्या होती. तिचे नाव दुर्गावती. दुर्गावती सुंदर होती. तिने तारुण्यात पदार्पण केले. राजाने तिचे लग्न करण्याचे ठरविले. वरसंशोधनाला सुरवात झाली. पण दुर्गावतीचे प्रेम दलपतशाहावर बसले होते. स्वाभिमानी, शूर दलपतशाहा आपला पती व्हावा अशी तिची इच्छा होती.

एकदिवस दलपतशाहाची प्रतिमा पाहात असताना राजकन्या दुर्गावतीजवळ राजा किरातसिंह आला. त्याने दरडावून विचारले, "हे कुणाचे चित्र ?"

"दलपतशाहाचे !" दुर्गाने न भिता सांगितले. "पिताजी, दलपतशाहाशी मी लग्न करण्याचे ठरविले आहे. दलपतशाहा शूर आहे..."

आपल्या कन्येस पुरते बोलू देण्यापूर्वीच किरातसिंह ओरडला "पण तो गोंड आहे. राजपूत राजकन्या गोंड राजाशी लग्न करीत नसते. तुला राजपूत राजाशीच लग्न करावे लागेल."

"पिताजी, दलपतशाहा शिवाय मी अन्य कुणाशी लग्न करणार नाही, हीच माझी प्रतिज्ञा,"

किरातसिंह निघून गेला.

लगेच दुर्गावतीने दलपतशाहाला लिहिलें, मी आपली राणी होऊ इच्छिते. आपण महोबावर चालून या आणि मला जिंका.

दुर्गावतीचे पत्र दलपतशाहाच्या हाती पडले. वाचले. त्याने लढाईची तयारी केली. रणशिंग फुंकले. सेना सज्ज झाली. महोबाकडे निघाली. महोंबाभोवती दलपतशाहाच्या सेनेचे कडे पडले. लढाईला सुरवात झाली. दलपतशाहाच्या पराक्रमापुढे किरातसिंहाचा पराक्रम फिका पडला. दलपतशाहा विजयी झाला. दलपतशाहाचे शौर्य पाहून किरातसिंह खूष झाला. त्याने आपली कन्या दलपतशाहाला दिली. दुर्गावतीला घेऊन दलपतशाहा राजधानीत परतला.

पुढे...दुर्गावतीला वीर नारायण नावाचा मुलगा झाला. वीर नारायण तीन वर्षाचा झाला तोच दलपतशाहाला काळाने

उचलून नेले. दुर्गावतीच्या डोक्यावर दु:खाचा कडा कोसळला. तिच्या नशिबी वैधव्याचे जिणे आले. तिने शोक आवरला. दु:ख गिळले. वीर नारायणाला गादीवर बसवून ती स्वत: राज्य कारभार पाहू लागली. तिने राज्यात अनेक सोयी केल्या. प्रजेला दलपतशाहा इतकीच राणी प्रिय झाली.

अकबर बादशाहाचे लक्ष गढामंडळाकडे गेले. ते राज्य हस्तगत करण्याचे त्याने ठरविले. या मोहिमेची जबाबदारी त्याने आसफखानावर टाकली. दुर्गावतीला युद्धात जिंकून तिच्याशी लग्न करण्याची आसफखानची इच्छा होती. सेनासंभार घेऊन तो गढा-मंडळाची वाट तुडवीत निघाला. राणी दुर्गावतीने पुरुष वेष धारण केला. लढाऊ हत्तीवर बसून आसफखानाशी सामना

देण्यासाठी ती ससैन्य निघाली. दोन्ही पक्ष समोरासमोर आले. एकमेकावर तुटून पडले. राणी शत्रूचा फडशा पाडीत होती. वीर नारायण युद्धात पडल्याची कटू वार्ता राणीने ऐकली. तिचे डोळे ओले झाले. पण तिचा धीर सुटला नाही. इतक्यात एक तीक्ष्ण

बाण शत्रूपक्षाकडून सुं सुं करीत निघाला. नेमकाच राणीच्या डोळ्यात घुसला. तिने खसकन उपसला. फेकून दिला. डोळ्यातून भळभळा रक्त वाहू लागलें. तरी ती डगमगली नाही. दुसरा बाण गळ्याला चाटून गेला. ती हत्तीवरून खाली कोसळली. राणीने जाणले, आसफखानाच्या अफाट सैन्यापुढे आपल्या मूठभर सैन्याचा निभाव लागणार नाही...आपला पराभव होईल...आपण शत्रू पक्षाच्या हाती सापडू...आपली मानहानी होईल...त्या-पेक्षा मृत्यू चांगला.

तिनें आपल्या एका विश्वासू सेवकाला हाक मारली. त्या सेवकाचे नाव आधारसिंह. आधारसिंह राणी दुर्गावती जवळ आला. त्याने विचारले, "काय राणीसाहेब ?"

"आधार, तुझ्याजवळील खंजिराने माझा शेवट कर. आसफखानाने माझी प्रतिष्ठा घेऊ नये अशी माझी इच्छा आहे."

आधार थरथर कापू लागला. राणीवर शस्त्र उगारण्याचे त्याला धैर्य झाले नाही.

मग राणीने स्वत:चा खंजीर उपसला. खसकन आपल्या छातीत खुपसला· राणी मरून पडली,

दुर्गावतीचे धैर्य, शौर्य व बलिदान पाहून आसफखान चकित झाला. त्याने बाराग्राम या गावी राणीची समाधी बांधली.



६ : केवढे हे स्वातंत्र्य प्रेम !

राणा उदयसिंहानंतर मेवाडच्या गादीवर आला प्रतापसिंह. नांवाप्रमाणे तो प्रतापी होता. स्वाभिमानी होता.

मेवाडची राजधानी चितोड. अकबर बादशाहाने चितोड जिंकले होते. प्रतापसिंहाने प्रतिज्ञा केली, "चितोड मिळविल्याशिवाय मी राहणार नाही."

एक-एक राजपूत राजा बादशाहाला मिळत होता. मांडलिकत्व पत्करत होता. राजा मानसिंह सुद्धा बादशाहाच्या सेवेत रुजू झाला होता. बादशाहाने त्याला सेनापती पद दिलें. राणा प्रतापसिंह बादशाहाला शरण यावा, त्याने एकनिष्ठपणे बादशाहाची सेवा करावी अशी मानसिंहाची इच्छा होती. प्रतापाची भेट घेऊन आपल्या मनातील इच्छा प्रदर्शीत करावी या उद्देशाने तो त्याच्याकडे आला, प्रतापाने त्याचा मानसन्मान केला. त्याची योग्य ती सोय केली. परंतु मानसिंहाच्या पंक्तीला प्रताप नेमका गैरहजर राहिला. त्याने कळविले, बाटग्या मानसिंहाच्या बरोबर भोजन करण्याची माझी मुळीच इच्छा नाही. अवमान ! मानसिंहाला अवमान वाटला ! तो सूड आणि संतापाने पेटला. या अवमानाचा बदला घेतल्याशिवाय मी राहणार नाही असे मनाशी ठरवून राजा मानसिंहाची स्वारी आल्या वाटेने निघून गेली.

आणि प्रतापाने देखील ठरविलें, "स्वप्नात देखील मी अकबराला शरण जाणार नाही ! काय म्हणून धर्मांतर करावे ?

बादशाहाचे अंकित बनावे ? स्वाभिमानशून्य व्हावे ? कितीहीं संकटाचे डोंगर कोंसळले तरीं मी धर्म आणि राज्य बुडविणार नाही."

प्रतापाला शरण आणण्याचे बादशाहाने ठरविले. त्याने सेना सज्ज केली. सेनेंचा प्रमुख म्हणून राजा मानसिंहाची नियुक्ती केली. या मोहिमेची जबाबदारी मानसिंहाने मोठ्या आनंदाने स्वीकारली. पंक्तीच्या प्रसंगी झालेंल्या अपमानाचा कलंक त्याला धुवून काढावयाचा होता ना ? शाही फौज संथगतीने मेवाडकडे सरकू लागली. प्रतापाने सैन्य गोळा केले. शत्रूला सामना देण्या-साठी तो तयार झाला. शाही फौज अरवली पर्वतात शिरली. प्रतापाचे लोक नकळत यायचे. शत्रूची लांडगेतोंड करून पळायचे. शत्रूसैन्याला त्राही भगवान करून सोडायचे.

मानसिंह पुढे सरकत होता. तो हळदी घाटाच्या खिंडीत शिरला. तोच प्रताप आपल्या लोकानिशी त्याच्यावर चालून आला. लढाई जुंपली. प्रतापाचे लोक निकराने लढू लागले. एक-एक वीर खाली कोसळत होता. हळदी घाटाची खिंड रक्ताने लालीलाल झाली. तलवारींचा खणखणाट होऊ लागला. बाणांचा सूं सूं आंवाज वातावरणात घुमू लागला. प्रताप चेतक नावाच्या घोडयावर स्वार होंता. तो पराक्रमाची शर्थ करीत होता. त्याच्या अंगावर अनेक जखमा झाल्या होत्या. मानसिंह हत्तीवर बसून लढत होता. प्रतापाने चेतक हत्तीवर घातला. यावेळी मानसिंह प्रतापाच्या तडाख्यातून वाचला. चेतक दमला होता. जखमी झाला होता. शाही सैनिकापुढे आपल्या मूठभर सैनिकांना जय मिळणे दुरापास्त हे जाणून प्रतापसिंहाने रणांगणावरून पाय काढला. धन्याला घेऊन चेतक भरधाव निघाला. प्रतापाच्या मागे



शत्रू सैन्य लागलें. आपला धनी शत्रूच्या हाती सापडू नये म्हणून चेतक विजेच्या वेगाने पळत होता. तो खूप थकला होता. तोंड फेसाळले होते. प्रतापाने मागे नजर फेकली. शत्रू सैन्य मागे फिरले होते. त्याने लगाम खेचला. चेतक थांबला. घोड्याच्या पाठीवरून प्रतापाने धाडकन खाली उडी घेतली. चेतकाच्या पाठीवरून तो हात फिरवू लागला. त्याला थोपटू लागला. धन्याला वाचविलें म्हणून चेतकाला समाधान वाटत होते. आनंद वाटत होता. आणि काय ! चेतक खाली कोसळला ! प्रतापाचा चेतक गेला ! केवढी मोलाची कामगिरी बजावली होती त्याने. प्रतापाच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. तो दुःखी झाला. ज्या ठिकाणी चेतक मेला त्या ठिकाणी त्याने चेतकाची समाधी बांधली.

हळदीघाटाच्या युद्धात प्रतापाला हार खावी लागली. आता त्याच्याजवळ पुरेसा पैसा नव्हता. फौजफाटा नव्हता. प्रधान भामाशाहाने पैसा पुरविला. प्रतापाला उत्साह आला. पैशाच्या

जोरावर त्याने सैन्य जमविले. चितोडच्या स्वातंत्र्यासाठी तो अकबराशी लढू लागला.

प्रतापाच्या डोक्यावर संकटे कोसळू लागली. तो राना-वनात दिवस काढू लागला. . . भाकरी खाऊन जगू लागला. . . गादी ऐवजी साध्या चटईवर झोपू लागला. पण अकबराला शरण गेला नाही. गेलेला मुलूख त्याने परत मिळविला. एकच इच्छा मनात राहिली—ती म्हणजे चितोड जिंकण्याची."

प्रताप थकला. आजारी पडला. त्याने सर्वांना जवळ बोला-विले. तो म्हणाला, "मित्रांनो ! मी लवकरच मरणार आहे. तत्पूर्वी चितोड जिंकण्याची शपथ घ्या. म्हणजे सुखाने मरण येईल मला."

सर्वांनी शपथ घेतली. आणि दुसऱ्याच क्षणी प्रतापसिंहाने निरोप घेतला. तो साऱ्यांना सोडून गेला. केवढे हे स्वातंत्र्यप्रेम राणा प्रतापसिंहाचे !

* *

७ : बालपणाचे बोल

मेहरून्नीसा ! ग्यासुउद्दीनाची कन्या ! बऱ्याच वेळा छोटी मेहर आपल्या बापाबरोबर दरबारात जात असे. तिचा बाप अकबराच्या दरबारातील एक पराक्रमी सरदार होता. एकदिवस—

आपल्या पित्याची करंगळी धरून, मंदमंद पावलें टाकीत आपल्या पायातील पैजणांचा मधुर झंकार उमटवीत छोटी मेहर दरबारात शिरली. सम्राट अकबरास कुर्निसात करून ग्यासुउद्दीन आपल्या आसनावर बसला.

"बैठ बेटी मेरे पास." मेहरचा बाप तिला म्हणाला.

यहाँ नही बैठूगी." सिंहासनाकडे बोट दाखवीत मेहर म्हणाली, "वहाँ बैठूगी !"

मेहरच्या बोलण्याचे अकबराला कौतुक वाटलें. त्याच्या हृदयरूपी सागरात वात्सल्याच्या लाटा उसळल्या तो उठला. सिंहासनाच्या पायऱ्या उतरून मेहरजवळ आला. लहानग्या मेहरून्नीसाला उचलून मोठ्या प्रेमाने तिच्या गालाचा मुका घेतला.

"वहाँ बैठूगी ना ?" अकबर बादशाहाने विचारले.

"हा !"

मेहरला घेऊन अकबर सिंहासनावर बसला. दरबारातील सरदारांना नवल वाटले. दिल्लीचा बादशाहा एका सरदार कन्येला उचलून तिचे लाड करतो. अकबर त्या बालमनाला नानातऱ्हेचे प्रश्न विचारून आपले मनोरंजन करीत होता. अकबर पुत्र सेलीम बाजूला एका आसनावर बसला होता. तिच्याकडे एकसारखा पाहात होता. मेहरच्या स्वर्गीय सौंदर्यावर तो बेहद खूष झाला. त्या दिवसापासून सेलीमला मेहर आवडू लागली.

लहानपणची मेहरून्नीसा आता राहिली नाही. ती मोठी झाली. दरबारात ती येईना. सेलीमला तिचे दर्शन क्वचितच घडे.

एक दिवस शाही उद्यानात मेहर आणि सेलीम उभे होते. वाऱ्याच्या झुळकीबरोबर फुलांचा सुगंध दरवळत होता. सेलीम मेहरच्या नजरेला नजर भिडवीत विचारीत होता, "मेहर !"

"क्या सेलीम ?"

"मी दिलेल्या दोन कबुतरापैकी तुझ्या हातातील एक कबूतर कसे उडालें ? सांग मेहर."

आपल्या हातातील दुसरेही कबूतर सोडून देत ती निर्भयपणे म्हणाली, "हे असे उडाले ! समजले ?"

मेहरच्या बोलण्यावर सेलीम आनंदातिशयाने खदखद हसला. तिच्या केससंभारावरून हात फिरवीत तो म्हणाला, "वा ! छान केलेस, मेहर तू !"

महालाच्या गच्चीवरून सम्राट अकबर पाहात होता. तो मनाशी पुटपुटला, "हे बरे नव्हे, एका सरदार कन्येवर शाहाजादा सेलीमने प्रेम करणे बरे नव्हे, बस्स ! यापुढे मेहर सलीमच्या दृष्टीस पडू देऊ नये. तिचा निका दूरच्या एका सरदाराशी लावला म्हणजे सेलीम तिची आठवण भुलील..."

झाले ! बंगाल प्रांतातील शेर अफगाणाशी सौंदर्य लतिका मेहरचा विवाह लावण्यात आला. मेहरला घेऊन शेर अफगाण बंगालमध्ये निघून गेला. परंतु सेलीमच्या दृष्टीपुढून मेहरची मूर्ती हलत नव्हती. तो विचार करी, अब्बाजानच्या पश्चात जेव्हा मी दिल्लीचा बादशाहा होईल तेव्हा मेहरला शेर अफगाणच्या महालातून खेचून आणील..तिच्याशी शादी लावील, तरच नावाचा सेलीम !"

सम्राट अकबराचें ते शेवटचे दिवस होते. तो पलंगावर बऱ्याच दिवसापासून खिळला होता. आणि एक दिवस दिल्ली शहर दुःखाश्रूंनी भरले. अकबर मृत्यू पावला. सेलीमने आपले नाव टाकून नवे नाव धारण केले--जहांगीर. बापाच्या मागे तो दिल्लीच्या तख्तावर बसला.

मेहरला जनानखान्यात आणण्यासाठी जहांगीरच्या हुकुमाने बंगालकडे फौज दौडू लागली. शेर अफगाण तलवार चालविण्यात

कमी नव्हता. शेर अफगाणाच्या राजधानी भोवती शाही सेनेचा वेडा पडला. दोन्ही पक्षाची लढाई सुरू झाली. एका रात्री--

बादशाही सेनेचा प्रमुख शेर अफगाणाच्या महालात शिरला. शेर अफगाण एका पलंगावर निद्रा देवीच्या आधीन झाला होता. दुसऱ्या एका मंचकावर मेहर शांतपणे पहुडली होती. खानाने सरकन तलवार उपसली. क्षणाचा विलंब न लावता शेर अफगाणाच्या अंगावर चालविली. कर्णभेदक किंकाळी झाली. रक्ताचे थारोळे पलंगावर साचले. शेर अफगाण खलास झाला ! किंकाळी झाली तोच मेहरून्नीसा खडबडून जागी झाली. पहाते तो आपल्या पतीचा देह रक्ताच्या थारोळ्यात पडला आहे. पलंगाजवळ रक्ताळलेली तलवार धरून खान उभा आहे. ती धावली. कर्णभेदक आरोळी ठोकून शेर अफगाणाचा छिन्नविछिन्न देह कवटाळू लागली. आसवांचा पूर एकसारखा तिच्या कमलनेत्रातून वाहू लागला.

मेहरून्नीसाला घेऊन बादशाही सेना दिल्लीला आली. तिला जहांगीरच्या स्वाधीन करण्यात आले. मेहरशी शादी लावण्याची इच्छा जहांगीरने दर्शविली. पण ती मृत शेर अफगाणाला--आपल्या पतीला–विसरू शकत नव्हती. शेर अफगाणापुढे जहांगीर तिला तुच्छ वाटत होता. तिला राहून राहून वाटत होते, आपल्या पतीला झोपेत ठार मारावे ? केवढा हा जहांगीरचा नामर्दपणा ! जहांगीर लग्नाबद्दल तिची विनवणी करायचा पण त्या मनधरणीला मेहर वश झाली नाही.

अशी काही वर्षे निघून गेली. शेर अफगाणाची स्मृती पुसली जाऊ लागली. मेहरून्नीसा बत्तीस वर्षाची झाली. पण किंचितही तिच्या सौंदर्यात कुठे बिघाड झाला नव्हता. का कुणास

ठाऊक ? मेहर जहांगीरच्या म्हणण्याला राजी झाली. ती जहांगीरची बनली.

मेहरून्नीसाची नूरजहान झाली. जहांगीरने तिचे नाव बदलले. नूरजहानच्या सौंदर्याकडे पाहात जहांगीर तिच्याजवळ तासनतास बसायचा. त्याला दारूचे व्यसन जडले. नूरजहानच्या हाती राज्यकारभार सोपवून जहांगीर विलासात वेळ घालवू लागला.

ज्या सिंहासनावर अकबर बादशाहा बसला होता, त्याच सिंहासनावर मेहरून्नीसा उर्फ नूरजहान आरूढ होऊन दिल्ली दरबारची सूत्रे हालवू लागली. 'वहाँ बैठूगी' हे तिचें बालपणाचे बोल खरे ठरले असे कोण म्हणणार नाही.

* *

८ : न्यायी जहांगीर

नूरजहान ! विलासप्रिय जहांगीर बादशाहाची बेगम ! प्रिय पत्नी !

ती नुसती सुंदरच नव्हती. अनेक कलात पारंगत होती, चतुर होती. कुशल होती. बुद्धिमान होती. फक्त एका कलेत ती निपुण नव्हती. ती कला म्हणजे धनुर्विद्या. धनुर्विद्या आपल्याला यावी, त्या कलेत आपण निष्णात व्हावे असे तिला वाटे. तिने आपल्या मनातील इच्छा जहांगीरजवळ बोलून दाखविली. आपल्या आवडत्या राणीची कोणतीही इच्छा तृप्त करण्यासाठी जहांगीर सदैव तयार होताच. नूरजहानवर त्याचे अपरिमित प्रेम होते.

मग काय ! धनुर्विद्येचें शिक्षण सुरू झाले. शाही महालाच्या गच्चीवर उभे राहून नूरजहान धनुर्विद्येचे धडे गिरवू लागली. थोडयाच दिवसात तिने ती कला आत्मसात केली. त्या कलेंत तीं प्रवीण झाली.

एक दिवस काय झाले...नूरजहानला शरसंधान करण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. ती उठली. मंदमंद पावले टाकीत, पायातील पैजणांचा मधुर झंकार उमटवीत शाही महालाच्या सौधावर आली. तिच्या हातात धनुष्य होता. पाठीशी भाला होता. भात्यात बाण होते. तिने भात्यातून बाण उपसला... धनुष्यावर चढविला...दोरी आकर्ण ओढली...आणि सूं सूं करीत बाण निघाला.

शाही महालापासून थोडयाशा अंतरावर संथपणे नदी वाहात होती. परीट व त्याची पत्नी नदीकाठावर कपडे धूत होते. नूरजहानने सोडलेलां बाण परटाच्या शरीरात घुसला. परीट खाली कोसळला. बाणामुळे त्याला मृत्यू आला. त्यावेळी परटाच्या बायकोला केवढे दुःख झाले याची कल्पनाच केलेली बरी ! तिच्या डोळयातून अश्रूच्या धारा एक सारख्या वाहात होत्या.

पतीचे प्रेंत घेऊन परटीण बादशाहाकडे निघाली. त्यावेळी जहांगीर बादशहा नुकताच दरबारात येऊन बसला होता. परटीण दरबारात आली. तिने रडत रडत तक्रार मांडली, "खाविंद ! मी जातीची परीट. धंदा कपडे धुण्याचा. आज माझा पती व मी नदीबर कपडे धूत होते. शाही महालाच्या गच्चीवरून सूं सूं करीत एक बाण आला तो नेमका माझ्या पतीच्या शरीरात घुसला. त्या बाणामुळे माझ्या पतीचा मृत्यू ओढवला. न्याय हवा मला."

जहांगीरने शांतपणे परटीण बाईचे म्हणणे ऐकून घेतले. दरबारात बडे बडे सरदार बसले होते. सरदारांना व बादशाहाला समजून आले की, बेगम नूरजहानच्या बाणामुळेच परटाचा जीव गेला.

"नूरजहानला दरबारात पेश करा !" बादशाहाचा हुकूम सुटला.

बादशाहाच्या हुकूमान्वये बेगम नूरजहानला दरबारात सिंहासनापुढे दाखल करण्यात आले.

बादशाहा सिंहासनावरून उठला. त्याने विचारले, "नूरजहान !"

"काय ?"

"आज शाही महालाच्या गच्चीवरून तू नदीकडे शरसंधान करीत होती काय ?"

"होय !" नूरजहान उत्तरली.

"तुझ्या बाणामुळे या परटीण बाईचा नवरा ठार झाला. तू माझी अत्यंत लाडकी पत्नी असली तरी गुन्हेगार आहेस. गुन्हेगाराला शिक्षा देणे हे राजाचें कर्तव्य ठरते, नूरजहान."

"सरकार ! माझ्या हातून महान अपराध घडला. गरीब परटीण बाईवर अन्याय घडला. या अपराधाबद्दल वाटेल ते प्रायश्चित भोगण्याची माझी तयारी आहे. आपण बादशाहा ! प्रजेचें पालनकर्ते ! आपण कर्तव्य कठोर असले पाहिजे. परटीण बाईचा वरा माझ्या बाणामुळे मेला, म्हणून मी गुन्हेगार ठरली. मी आपली पत्नी असली तरी शिक्षा ठोठावताना मनाचा किंचितही तोल सुटता कामा नये. मला देहांत शासनाची शिक्षा मिळावी."

"देहांत शासन ! पण तुला नव्हे मला–या तुझ्या पतीला ! तुला देहांत शासनाची शिक्षा देऊन कसे चालेल ? याला न्याय म्हणता येणार नाही. तुझ्या बाणामुळे परटाचा जीव गेला... परटीण बाई विधवा झाली...दु:खाचा डोंगर तिच्या डोक्यावर कोसळला...मरेपर्यंत तिला वैधव्याचें जीणे जगावे लागणार. ती आता जहांगीरला ठार करील. तू विधवा होशील. हीच ती शिक्षा ! हाच तो न्याय !"

सिंहासनाच्या पायऱ्या ताड ताड उतरून जहांगीर त्या परटीणबाईजवळ गेला. तिच्या हातात धनुष्य व बाण देऊन तो म्हणाला, "बाई ! मी इथे उभा आहे. धनुष्य सज्ज कर. सोड बाण माझ्यावर. तुझ्या पतीच्या खुनाचा बदला घे. चल आटोप."

परटीण बाईच्या डोळ्यात आसवांची गर्दी झाली. तिच्या हातातून धनुष्यबाण गळून पडला. तिचा कंठ दाटून आला. ती म्हणाली, "नाही ! नाही !! मी न्यायी बादशाहाला मारणार नाही ! मी असले वाईट कृत्य करणार नाही ! माझ्या हातून बादशाहाला ठार मारण्याचें पाप घडणार नाही ! मी तर विधवा झालेच पण बेगमसाहेबांना मी विधवा करू इच्छित नाही. त्यांना उगीच दु:खाच्या दरीत लोटण्याचे कुकर्म माझ्याकडून होणार नाही. मी खाविंदांच्या चरणी विनंती करते. की त्यांनी फर्मा-विलेली शिक्षा मागे घ्यावी. त्याशिवाय मी येथून हलणार नाही !"

परटीण बाईच्या इच्छेनुसार, विनंतीनुसार बादशाहाने शिक्षा मागे घेतली. तिच्या मरणापर्यंत तिच्या खाण्यापिण्याची सोय बादशाहाने केली.

असा होता न्यायी जहांगीर !

BVBK-0400354